जा. क्र. ना. बँका / डी-४ / इमारत निधी / ७० (इ) / ९७
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय,
दिनांक : ९ ऑक्टोबर, १९९७.

प्रति,
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, (सर्व)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, (सर्व)

**विषय: नागरी सहकारी बँका / नागरी सहकारी पतसंस्था / सेवकांच्या सहकारी पतसंस्था यांना इमारत निधीतून गुंतवणूक करण्यात परवानगी मिळणेबाबत.**

वरील विषयाचे बाबतीत या कार्यालयाकडील दिनांक २३-७-९७ व २३-११-९३ ची परिपत्रके कृपया पहावीत.

२) नागरी सहकारी बँकाकडून / खात्याच्या अधिकाऱ्यांकडून या कार्यालयाकडे प्राप्त होणारी वरील विषयासंबंधीची प्रकरणे या कार्यालयाने दिनांक : २३-११-९३ च्या परिपत्रकान्वये ठरवून दिलेल्या नमुन्यानुसार सर्व माहिती / कागदपत्रासह परिपूर्ण नसतात असे सदर प्रकरणांची छाननी करता दिसून आले आहे. त्यामुळे सदर माहिती वारंवार मागविण्यात, ती प्राप्त होण्यात व तद्नुषंगाने पुन्हा छाननी होऊन प्रकरण परिपूर्ण करुन घेण्यास कालापव्यय होतो.

३) या संदर्भात प्रस्तावात आवश्यक असणाऱ्या / लागणाऱ्या माहिती / कागदपत्रे याबाबत सुधारीत नमूना यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर सुधारित नमून्यातील संबंधित माहिती / कागदपत्रे प्रस्तावात असणे आवश्यक असून या नमून्यानुसार सर्व माहिती / कागदपत्रे यासह परिपूर्ण असे इमारत निधी गुंतवणुकीचे प्रस्ताव आवश्यक त्या जादा माहितीसह व आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास तीन प्रतीत पाठवावेत.

४) ज्या प्रकरणामध्ये नमून्यानुसार सर्व माहिती / कागदपत्रे यांची पूर्तता होत नसेल अशी अपूर्ण प्रकरणे कोणत्याही परिस्थितीत, खास बाब म्हणून अथवा कोणतेही कारण देवूनही या कार्यालयास पाठवू नये. नमून्यातील माहिती / कागदपत्रांच्या अभावी या कार्यालयास पाठविलेल्या अपूर्ण प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही /-
**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता ....**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा.क्र.ना. बँका/डी-४/७०-ई/मालमत्ता गुंतवणूक/२००५
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक ४-४-२००५

विषय : नागरी सहकारी बँका/नागरी सहकारी पतसंस्थांना मालमत्तेमध्ये गुंतवणूक करण्यास परवानगी देणेबाबत..

संदर्भ : १) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.बँका/डी-४/ठेवी स्विकारणे/२००२ दिनांक १०-६-२००२

२) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.बँका/डी-४/कलम ७०डी/बँक गुंतवणूक/२००३ दिनांक २४-५-२००४

## परिपत्रक

संदर्भ क्र. १ चे परिपत्रकान्वये या कार्यालयाने नागरी सहकारी पतसंस्थांना राज्यातील सर्व शेड्युल्ड सहकारी बँकांमध्ये त्यांचे अतिरिक्त निधी गुंतवणूक करण्यास तसेच संदर्भ क्रमांक २ चे परिपत्रकान्वये नागरी सहकारी पतसंस्थांना कोणत्याही नागरी सहकारी बँकेत (बँकेचा एम.आय.एस. वर्ग अ+ असेल तर एकूण टप्प्याच्या १०% आणि एम.आय.एस. वर्ग अ असेल तर एकूण ठेवीच्या ५% ठेवी) ठेवी गुंतवणूक म्हणून ठेवण्याबाबत परवानगी देण्यात आलेली आहे.

तथापि नागरी सहकारी बँका/पतसंस्थांकडून मालमत्तेमध्ये गुंतवणुकीस परवानगी देणेबाबत वेळोवेळी प्रस्ताव संबंधीत निबंधकाकडे दाखल केले जातात.

या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, नागरी सहकारी बँका/नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना त्यांचे स्तरावर निबंधकाचे पूर्व परवानगीशिवाय इमारत निधीतून गुंतवणूक करण्यास खालील नमूद केलेल्या अटीवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७० ई नुसार परवानगी देण्यात येत आहे.

अटी :

१) मागील तीन वर्षे बँकेचा/पतसंस्थेचा लेखापरिक्षण वर्ग अ असावा.

२) एम.आय.एस. वर्ग अ असावा.

३) मागील तीन वर्षात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३,८८,७८ व ७७ अंतर्गत कारवाई झालेली नसावी.

४) बँक पतसंस्था नफ्यात असावी.

५) बँकेला/संस्थेला मालमत्तेमध्ये गुंतवणूक करण्यासाठी बँकेत. स्वतंत्र खात्यामध्ये इमारत निधी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

६) जागा/इमारतीचे मूल्यांकन शासकीय मूल्यांकनकाराकडून करून घेण्यात यावे.

७) मात्र इमारत/जागा याचे दर दुय्यम निबंधक, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे जिल्हा दर सूची यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त नसावेत.

८) राखीव निधी वापरण्यास मागील वर्षी परवानगी दिली असल्यास दिलेल्या मंजुरीनुसार राखीव निधीची अग्रक्रमाने परतफेड झाली पाहिजे.

९) सदर गुंतवणुकीस वार्षिक साधारण सभेची पूर्व परवानगी घेण्यात यावी.

सही/-

मा. सहकार आयुक्त
यांचे मान्यतेने

अप्पर निबंधक, सहकारी संस्था
(तपासणी व निवडणुका) महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) (सर्व)
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४) जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, (सर्व)

प्रत :

१) मा. सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
यांना माहितीसाठी सादर.

जा.क्र.ना.बँका/डी-४/म्युच्युअलफंड/गुंतवणुक/०७
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक ३ जानेवारी २००८

# परिपत्रक

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांना एच.डी.एफ.सी. बँक, आय.सी.आय.सी.आय. बँक, यु.टी.आय. रिलायन्स म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**संदर्भ : या कार्यालयाचे सम क्रमांकाचे परिपत्रक दिनांक १२-७-२००७**

या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भीय दिनांक १२-७-२००७ चे परिपत्रकान्वये राज्यातील सर्व नागरी सहकारी पतसंस्थांना संस्थेच्या नावाने म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्यास परवानगी दिलेली होती.

तथापि सद्या रिझर्व्ह बँकेने म्युच्युअल फंडात गुंतवणूक करतानाची जोखीम विचारात घेता, सर्व नागरी सहकारी बँकाना अशा प्रकारे म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्यास निर्बंध जारी केलेले आहेत. सबब त्याच धर्तीवर नागरी सहकारी पतसंस्थांनाही म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्यास निर्बंध जारी करणे आवश्यक आहे.

सबब या परिपत्रकान्वये सर्व नागरी सहकारी पतसंस्थांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त दिनांक १२-७-२००७ चे परिपत्रकान्वये नागरी सहकारी पतसंस्थांना म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्यास दिलेली मंजुरी पुढील आदेश होईपर्यंत रद्द करण्यात येत आहे. पतसंस्थांनी या परिपत्रकाचे दिनांकापासून कोणत्याही म्युच्युअल फंडात गुंतवणूक करु नये.

सर्व विभागीय सहनिबंधक/जिल्हा उपनिबंधक/तालुका सहायक निबंधक सहकारी संस्था यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सदर बाब आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पतसंस्थांच्या निदर्शनास आणून द्यावी व आपल्या विभागामध्ये/जिल्ह्यामध्ये सदर परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही होईल असे पहावे.

सही/-
**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रति,
१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) सहायक निबंधक सहकारी संस्था (सर्व)
४) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुंबई
५) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन
६) अध्यक्ष/सचिव डिपॉझीट गॅरंटी कॉर्पोरेशन लि.

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता**